RANE PRAKASHAN PRIVATE LIMITED

शब्दांना सत्याची धार

प्रहार

# लीलावती हॉस्पिटलचे लवकरच अत्याधुनिक कॅन्सर केअर इन्स्टिटयूट सुरू होणार

◆ मुंबई (प्रतिनिधी ):

लीलावती हॉस्पिटलने नवीन कॅन्सर केअर इन्स्टिटयुटची घोषणा केली असून, कर्करोगाने ग्रस्त रुग्णांना दिलासा देण्यासाठी मुंबईत ३०० खाटांच्या या रुग्णालयात अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत. कर्करोग उपचारांमध्ये क्रांती घडवून आणण्यात याचा नक्कीच मोलाचा वाटणार राहणार आहे.

एका कार्यक्रमात यावेळी महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, महाराष्ट्राचे सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर,माहिती व तंत्रज्ञान मंत्री आशिष शेलार,वाहतूक मंत्री प्रताप सरनाईक,खासदार डॉ.श्रीकांत शिंदे,मेयो क्लिनिकचे आंतरराष्ट्रीय आणि एंटरप्राइज ऑटोमेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी बिजू सॅमकुट्टी,लीलावती हॉस्पिटलच्या संस्थापक आणि स्थायी विश्वस्त चारू मेहता,लीलावती हॉस्पिटलचे स्थायी विश्वस्त राजेश मेहता,प्रशांत मेहता,राजीव मेहता आदी उपस्थित होते. नव्याने सुरु केली जाणारी ही कॅन्सर केअर संस्था रुग्णसेवेतील प्रत्येक टप्प्यांवर अचुक उपचार आहे. याठिकाणी प्रत्येक रुग्णाला वैयक्तिकरित्या तसेच उत्तमोत्तम वैद्यकिय सेवा मिळेल याची खात्री केली जाणार आहे. आता रुग्णांना उपचारांसाठी परदेशात जाण्याची गरज भासणार नाही आणि त्यामुळे त्यांचा वेळ आणि पैसा दोन्ही वाचणार आहे, असे लिलावती हॉस्पिटलकडून सांगण्यात आले.

रुग्णसेवा प्रदान करण्याबरोबरच याठिकाणी वैद्यकिय तज्ज्ञ,संशोधक आणि सहाय्यक कर्मचाऱ्यांसाठी नोकरीची संधी उपलब्ध होणार आहे.जी अर्थव्यवस्थेला चालना देईल,त्याचबरोबर मुंबईतील आरोग्यसेवा क्षेत्राच्या एकूण विकासात त्याचे मोलाचे योगदान राहिल. हे कॅन्सर केअर इन्स्टीटयुट कर्करोगाच्या वेळीच आणि अचूक निदानासाठी,रुग्णांच्या प्रकृतीत सुधार आणण्यासाठी आणि मृत्यू दर कमी करण्यासाठी एआय-तंत्रज्ञानाचा वापर करेल. शिवाय,लीलावती हॉस्पिटलच्या माध्यमातून समाजास कर्करोगाची लक्षणे आणि प्रतिबंधात्मक उपायांबद्दल शिक्षित करण्यासाठी वेळोवेळी जागरूकता मोहिमा राबविण्यात येणार आहे. यामुळे निरोगी समाज तयार करण्यास याचा नक्कीच फायदा होईल.

नर्सिंग एक्सलन्स प्रोग्राम सुरू करण्यासाठी मेयो क्लिनिकसोबत हात मिळवणी करण्यात आली असून यामध्ये विशेष प्रशिक्षण आणि विकासाद्वारे नर्सिंग कर्मचाऱ्यांचे कौशल्य आणि ज्ञानात भर पाडण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.